आर.सी.एस. नं.२७९/२०१८
बबन **वि.** धनंजय व इतर
निशाणी क्र.४७

प्रतिवादी तर्फे सा.क्र.१
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव– धनंजय सदाशिव राऊत,
वय– ७३ वर्ष, धंदा– काही नाही,
राहणार– बाणेर, पुणे

**प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा सरतपास ॲड. श्री. पी.के. खोल्लम यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

१. माझ्या शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला असुन तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**सरतपास संपला.**

**वादीतर्फे ॲड. श्री. एच.डी. भोईटे यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु –**

२. हे मला सांगता येणार नाही की, किती क्षेत्राबदल दाव्यामध्ये वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे खरेदीखताचे क्षेत्राबदल दौंड न्यायालयात दिवाणी दावा क्र.१६४/२००५ दाखल झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र.१६४/२००५ हा मला ज्या व्यक्तीने खरेदी दिली होती, त्याचेविरुध्द व सदर प्रकरणातील वादी बबन म्हस्के यांचेविरुध्द मी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र.१६४/२००५ या दाव्याचा निकाल दि.०५/०९/२०१२ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, सदर निकाल माझ्याविरुध्द लागल्याने मी बारामती न्यायालयात दिवाणी अपील क्र.९१/२०११ दाखल केले होते. सदर बारामती येथील अपीलात माझ्याविरुध्द निकाल झाला. हे म्हणणे खरे आहे की, वादीने माझ्या क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे.

३. वादी हा माझे ५ गुंठे क्षेत्रावर मागील २० वर्षापासुन ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी खरेदी घेतलेल्या जमिनीची ७/१२ सदरी कब्जेदार म्हणुन नोंद झाली नाही. साक्षीदार सांगतो की, ७/१२ च्या इतर हक्कामध्ये नोंद झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी २८ वरील ७/१२ मध्ये इतर हक्कात सदर व्यवहार बेकायदेशिर असल्याबाबत नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी मागील २१

वर्षात ५ गुंठे क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत दावा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व वादीमध्ये गट क्र.९३०/१३ मधील ५ आर क्षेत्राबाबत खरेदीचा व्यवहार ठरला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर करार दि.०५/०३/२००९ रोजी नोटरीसमोर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर क्षेत्र ३,५०,०००/– रुपयास वादीला विक्री करण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने व्यवहारापोटी मला रोखीने ५०,०००/– रुपये व धनादेशाद्वारे रु.१,५०,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर गट क्र.९३०/१३ मधील ५ गुंठे क्षेत्र ज्यावेळी माझ्या नावे होईल, त्यावेळी उर्वरीत रक्कम देण्याबाबत माझ्यामध्ये व वादीमध्ये ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, बारामती व दौंड येथील न्यायालयात माझ्याविरुध्द निकाल लागल्याने वादीने मला दिलेले दोन लाख रुपये परत मागितले होते.

**प्रश्न –** तुम्ही कशामुळे वादीकडुन पैसे घेतले?

**उत्तर –** माझे व वादीचे संबंध असल्यामुळे मी त्यांच्याकडुन पैसे घेतले होते.

मी वादीकडुन किती रक्कम रोख घेतली होती, हे मला आठवत नाही. साक्षीदार सांगतो की, मी वादीला पैसे परत देवुन टाकले. मी वादीला किती पैसे परत दिले, हे मला आठवत नाही. माझ्यामध्ये व वादीमध्ये पैसे देण्या–घेण्यावरुन कोणतीही लिखापडी झाली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला पैसे परत द्या म्हणुन नोटीस पाठवली. मी माझ्या कैफीयतमधील मजकुर वाचला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला दोन लाख एक हजार रुपये देणे असल्याने व सदर रक्कम मला वादीला द्यायचे नसल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील व कैफीयत मधील मजकुर खोटा आहे. मी वादीला पैसे परत दिल्याचे खोटे सांगत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>.**

**<u>फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Sd/–

दौंड

दिनांक– २५.०६.२०२५

(एस.एन. पाटील)

२रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड

ता.दौंड, जि. पुणे

आर.सी.एस. नं.२७९/२०१८

बबन

**वि.** धनंजय

**निशाणी ४१**

**वादी तर्फे सा.क्र.१**

कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव– बबन महादेव म्हस्के,
वय– ६६ वर्ष, धंदा– शेती,
राहणार– पाटस, ता. दौंड, जि.पुणे

**<u>वादीतर्फे साक्षीदाराचा सरतपास अॅड. श्री. भोईटे यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

१. माझ्या शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला असुन तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी लिहुन घेणार म्हणुन माझी सही आहे. दि.१६/०४/२००९ च्या माझ्या व प्रतिवादीमध्ये झालेल्या करारनाम्यामध्ये मी लिहुन घेणार होतो. आता मला सदर करारनाम्याची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी लिहुन घेणार म्हणुन सही आहे. त्यास **निशाणी ४२** देण्यात येते.
**सरतपास संपला.**

**<u>प्रतिवादीतर्फे अॅड. खोल्लम यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु -</u>**

२. दि.१६/०४/२००९ रोजीचा नोटरीचा करारनामा आम्ही अॅड. देसाई नोटरी यांच्याकडे केला होता. आम्ही मुळ कागद देसाई वकीलांकडुन केला होता. तो कागद त्यांनी मला त्याच दिवशी वापस दिला होता. तो करारनाम्याचा कागद माझ्याकडे ब-याच वर्षांपासुन होता परंतु, तो तीन वर्षापुर्वी हरवला. सदर नोटरीचा मुळ कागद हरवल्याबाबत मी फिर्याद दिली होती परंतु, त्याची प्रत मी प्रकरणात दाखल केली नाही.

**प्रश्न** - सदर करारनामा कोठुन हरवला?
**उत्तर** - सदर करारनामा मी पाटस येथुन निघाल्यानंतर माझ्याकडुन कोठेतरी पडला.

३. हे म्हणणे खरे आहे की, सदर करारनामा हरवला याबाबत माझ्या तोंडी शब्दाव्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा नाही. साक्षीदार सांगतो की, पोलिस स्टेशनची फिर्याद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस स्टेशनमध्ये दिलेल्या फिर्यादची प्रत प्रकरणात दाखल केली नाही.

**प्रश्न** - सदर करारनामा हा कोणी लिहिला
**उत्तर** - सदर मजकुर मी व प्रतिवादीने सांगितला व तो ए.बी. सुर्यवंशी यांनी टाईप केला.

४. मी सदर प्रकरणात ए.बी. सुर्यवंशी यांची साक्ष घेणार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर करारनाम्यात लिहिलेली रक्कम दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दस्त हा तारणाचा होता.

**प्रश्न** - सदर करारनाम्यावरील साक्षीदार कोण होते?
**उत्तर** - विश्राम काशीनाथ घोले, नारायण बगाराम भागवत हे होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्ताच्या अनुशंगाने मी खरेदीखत करुन द्या म्हणुन प्रतिवादीला नोटीस पाठविली नाही.

**प्रश्न** - प्रतिवादीला नोटीस न पाठविण्याचे काय कारण?
**उत्तर** - माझ्या मध्ये आणि प्रतिवादीमध्ये दुसरा दावा चालु होता व त्याचा निकाल लागला होता. त्यामुळे मी नोटीस पाठविली नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, दाव्याचा निकाल लागल्यानंतर देखील मी प्रतिवादीला नोटीस पाठवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्त तारणाचा होता व सदर रक्कम प्रतिवादीने दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात मी केवळ प्रतिवादीकडुन विसार रक्कम मागितली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीकडुन रक्कम मागण्याची व खरेदीखत करुन मिळण्याची मुदत संपल्यामुळे खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ४२ वरील दस्त हा बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीकडुन काहीही मागण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मी सदर प्रकरणात काशीनाथ घोले व नारायण भागवत यांना साक्षीदार म्हणुन तपासणार आहे.
**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
Sd/-

दौंड (एस.एन. पाटील)
दिनांक– १९.०९.२०२४ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड
ता.दौंड, जि. पुणे